दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २१६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.६ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ब्लास्टींगमुळे वहाळ गावातील घरांना हादरे

## सुमारे १०० घरांना तडे : ग्रामपंचायतीची सिडको पोलिसांकडे तक्रार



**दै.रायगड नगरी । उरण**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सपाटी करणाच्या कामासाठी दररोज करण्यात येत असलेल्या बोर ब्लास्टींगमुळे भुंकपा सारखे हादरे वहाळ गावांतील रहिवाशांच्या घरांना बसत आहेत. सततच्या बोर ब्लास्टींगमुळे वहाळ गावातील सुमारे १०० घरांना तडे गेले आहेत.यामुळे रहिवाश्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून बोर ब्लास्टींगचे काम बंद न केल्यास विमानतळाचे कामकाज बंद करण्यासाठी ग्रामस्थांच्या माध्यमातून आंदोलन छेडण्याचा कडक इशारा वहाळ ग्रामपंचायतीने सिडकोला दिला आहे.**

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीसाठी उरण विधानसभा मतदारसंघातील गावांची जमिन शासनाने सिडकोच्या माध्यमातून संपादीत करण्यात आली आहे. सध्या नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सपाटीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. डोंगर, टेकड्यांचे सपाटीकरण करण्यासाठी बोर ब्लास्टींगचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. यासाठी नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाचे ठेकेदार अदानी इंटरनॅशनल एअरपोर्ट कंपनीला पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा विभागाने कंट्रोल ब्लॉस्ट करण्याच्या सूचनाही केल्या आहेत. मात्र दररोज दुपारच्या वेळी बोर ब्लास्टींग करताना शासनाचे सर्वच नियम धाब्यावर बसवून क्षमतेपेक्षा अधिक स्फोटाकांच्या प्रमाणाचा वापर मेसर्स. अदानी इंटरनॅशनल एअरपोर्ट कंपनीकडून केला जात आहे.

नवीमुंबई विमानतळाच्या सपाटीकरणाच्या कामासाठी दररोज दुपारच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बोर ब्लास्टींगमुळे वहाळ गावातील सर्वच रहिवाशांच्या घरांना मोठ्या प्रमाणावर हादरे बसू लागले आहेत.एखाद्या भुकंपाप्रमाणे मोठ्या प्रमाणावर बसणाऱ्या हादऱ्यांमुळे ३०० घरांपैकी सुमारे १०० घरांना मोठ्या प्रमाणावर तडे गेल्याची माहिती जबरदस्त हादऱ्यामुळे संपुर्ण घरच कमकुवत बनल्याने घर राहाण्यास धोकादायक बनले असल्याची व्यथा दामोदर धावजी पाटील यांनी ही मांडली.



ग्रामपंचायत सदस्य अमित तसेच चेतन घरत यांनी दिली आहे. वहाळ गावातील रहिवासी केसरीनाथ दापोळकर यांच्या आरसीसी घराच्या कॉलमला मोठ्या प्रमाणावर तडे गेले आहेत. घरातील तीनही भिंतीनाही तडे गेले असल्याने सातत्याने जीवमुठीत धरुनच घरात राहावे लागत आहे. मात्र भीतीमुळे लहान मुलांना दुसऱ्या घरी पाठविण्यात आले असल्याची माहिती ही केसरीनाथ दापोळकर यांनी दिली. तर आशाबाई दापोळकर या विधवा महिलेच्या घरातील घर,जीना,लाद्या,सिलिंगला ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर तडे गेले आहेत. आर्थिक ओढाताण करून बांधलेल्या एकमेव घरात दोन मुलांसह राहते. दररोज मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बोर ब्लास्टींगमुळे वित्त, जिवितहानी होण्याच्या भीतीने घरात नाईलाजाने वास्तव्य करून राहतात असल्याची खंतही आशाबाईंनी व्यक्त केली आहे. बोर ब्लास्टींगच्या

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामासाठी डोंगर टेकड्या यांच्या सपाटीकरणाच्या सुरु असलेल्या बोर ब्लास्टींगमुळे वहाळ गावातील घरांना हादरे बसत आहेत. अनेक घरांना तडे ही गेले आहेत.तसेच सततच्या स्फोटामुळे रहिवाशांच्या शिजविलेल्या अन्नात माती पडत आहे. त्यामुळे जीवन असह्य झाले आहे. या गंभीर घटनेची दखल न घेतल्यास वित्त व जिवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत सिडकोच्या एअरपोर्ट विभाग व पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी करून बोर ब्लास्टींग बंद करण्यात यावे अन्यथा विमानतळाचे कामकाज बंद करण्यासाठी जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती वहाळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पुजा समिर पाटील यांनी दिली.

# खड्ड्यातील पाण्यात बुडून दोन वर्षीय मुलीचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इमारतीच्या बांधकाम ठिकाणी असलेल्या पाणी भरलेल्या पाच –सहा फूट खोल खड्ड्यात पडून दोन वर्षीय मुलगी बुडाल्याने त्यात तिचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे.

पुष्पक नगर ,करंजाडे येथे मोल मजुरी करण्याऱ्या कुटुंबियांसोबत कु. रिया राजकुमार मुर्मू ( वय २ ) ही राहत होती. ती आपल्या भावा सोबत त्या ठिकाणी खेळत असताना नकळतपणे लिफ्टच्या खड्ड्यावर लावलेल्या लाकडी फळ्या व फ़्लायवूड यांच्या मध्ये असलेल्या मोकळ्या जागेमधून पाणी भरलेल्या पाच –सहा फूट खोल खड्ड्यात पडून ती बुडाल्याने त्यात तिचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ठेकेदार मिळत नसल्याने कर्जत रेल्वे स्थानकातील वॉटर व्हेंडिंग मशीन बंद ; प्रवाशांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानकात वॉटर व्हेडिंग मशीन आहे. सध्या ती बंद आहे. याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाला विचारले असता ठेकेदार मिळत नसल्याने ही वॉटर व्हेंडिंग मशीन बंद असल्याचे रेल्वे प्रशासनाने लेखी कळविले आहे. ह८ मशीन बंद असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून पाण्यासाठी नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

काही वर्षा पूर्वी कर्जत रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक एक वर वॉटर व्हेंडिंग मशीन बसविण्यात आले होते. या वॉटर व्हेंडिंग मशीन मधून पाणी मिळत असे. पाणी रिफील करून हवे असल्यास ३०० मिली साठी १ रुपया ,५०० मिली साठी ३ रुपये, १ लिटर साठी ५ रुपये , २ लिटर साठी ८ रुपये, ५ लिटर साठी २० रुपये तसेस कंटेनर मध्ये पाहिजे असल्यास म्हणजे पाऊच किंवा बाटली सहित पाहिजे असल्यास ३०० मिली साठी २ रुपये , ५०० मिली साठी ५ रुपये , १ लिटर साठी ८ रुपये , २ लिटर साठी १२ रुपये, ५ लिटर साठी २५ रुपये असा दर आकारण्यात येत होता.

स्वच्छ व निर्भेळ पाणी मिळत असल्याने प्रवासी खास करून गरीब प्रवाशांना याचा खुप उपयोग होत असे परंतु काही दिवसांपासून वरील वॉटर व्हेंडिंग मशीन बंद असल्याने प्रवासी वर्गाची फ़ारच गैरसोय होत आहे. या बाबतीत




सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता प्रशासनाने सदर वॉटर व्हेंडिंग मशीन साठी ठेकेदार मिळत नसल्यामुळे ही मशीन सुरू करण्यात येत नाही. रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना पाठविलेल्या उत्तरात असे म्हणते आहे की, या बाबतीत कर्जत येथील वॉटर व्हेंडिंग मशीन पुन्हा सुरू करण्या करिता रेल्वे प्रशासनाने दिनांक ०३ जुन २०२२, २८ जुन २०२२, २६ जुलै २०२२, २२ ऑगस्ट २०२२ तसेच २२ ऑगस्ट २०२२ रोजी निविदा काढण्यात आल्या होत्या परंतु या बाबतीत एकही ठेकेदार पुढे न आल्यामुळे वॉटर व्हेंडिंग मशीन सुरू करणे शक्य नाही असे कळविले आहे.

# म्हसळा तालुक्यातील मादांटणे येथील अल्पवयीन मुलीवर बलात्कार

## आरोपीला म्हसळा पोलीसांनी केली तात्काळ अटक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यांतील मादांटणे येथील अत्पवयीन मुलीवर (वय १६वर्ष)बलात्कार केल्याची घटना घडली मुलीच्या वडीलांनी म्हसळा पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्याने बालक लैंगिक कृत्ये संरक्षण कायदा २०१२ (पोस्को), ४,८,१२ प्रमाणे म्हसळा पोलीसानी गुन्हा नोंदविला असून सपोनी संदीपान सोनावने आणि तपासी अंमलदार मपोसई वाय.पी.बांडे यानी आरोपीला तात्काळ अटक केल्याचे पोलीस सूत्रानी सांगितले. तपासी आधीकाऱ्याने दिलेल्या माहीतीनुसार गावांतील ३८ वर्षाचे नराधमाने मंगळवार दि.१ नोव्हें. ते गुरवार दि. ३नोव्हें. या कालावधीत मांदाटणे येथील एका घराचे मागील पडवीत अल्पवयीन मुलीवर (तीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन) बलात्कार करण्याची घटना घडली.

बाल हक्क संरक्षणविषयक आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कराराच्या ११ डिसेंबर, १९९२ रोजीच्या अटींना भारत सरकारने सुद्धा मान्यता दिली आहे. त्याआधारे केंद्राने भारतासाठी २०१२ मध्ये बालक लैंगिक कृत्ये संरक्षण कायदा तयार केला आहे. त्याला संक्षिप्तपणे 'पोस्को' कायदा असेही म्हटले जाते.

लैंगिक कृत्याच्या गंभीरतेनुसार किमान तीन वर्षे, पाच वर्षे, दहा वर्षे व जन्मठेप देण्याची कायद्यात तरतूद आहे. गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपीने अनैसर्गिक लैंगिक कृत्य करण्यासाठी जिवे मारण्याचा प्रयत्न करणे अथवा ते कृत्य करण्यास भाग पाडणे असे प्रकार केले आसल्याबद्दल आरोपीला जन्मठेपेची कठोर शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे.

## रस्त्यावर डांबर पेक्षा खडी जास्त !

# बोर्लीपंचतनमध्ये खड्डे बुजवायला तात्पुरती मलमपट्टी

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहरातून जाणाऱ्या श्रीवर्धन रस्त्यावरील सध्या खड्डे बुजवण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. मात्र, हे खड्डे बुजवताना योग्य प्रमाणात डांबर आणि खडी वापरली जात नसल्याने तात्पुरती मलमपट्टी केल्यासारखे खड्डे दिसत आहेत. त्यामुळे वाहनचालक याबाबत नाराजी व्यक्त करीत आहेत.

आदगाव ते शिस्ते तसेच बोर्लीपंचतन शहरातून श्रीवर्धनकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन दिवसात बुजवण्यात आलेल्या खड्ड्यातील खडी चार तासांनतर खड्ड्याबाहेर आलेली दिसत असल्याने खड्ड्याची दुरुस्ती म्हणजे मलमपट्टीचेच काम होत असल्याचे दिसत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विभागामार्फ़त हे काम होत आहे. मात्र, कंत्राटदार करत असलेल्या अशा कामांकडे विभागाचा कानाडोळा होत असल्यामुळे वाहनचालकांमधून नाराजी होत आहे. त्यामुळे भविष्यात होणाऱ्या अपघाताला कोण जबाबदार राहणार? असा प्रश्न वाहनचालकांमधून विचारण्यात येत आहे. खड्डे बुजवल्यानंतर रोलर न फिरवल्याने वरवरची खड़ी वाहने जाउन रस्त्यालगत जमलेली पहायला मिळते.

वरवर बुजवल्यासारखे दिसणारे खड्डे पुन्हा मुळ स्वरूपात येत आहेत. यापूर्वी झालेल्या



पावसाळ्यात या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्यास मुळात उशीर झालेला असताना आता या रस्त्यावरून लहान वाहनांसह जडवाहतूक रात्रंदिवस चालणार आहे. त्यामुळे सरसकट होत असलेली ही मलमपट्टी किती दिवस चालणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यात 'डांबर कमी आणि खडी जास्त' असा प्रकार होत असल्याचे अनेकांच्या निदर्शनास येत आहे.

एका बाजूला शासनाने


.../२

# मध्यावधी निवडणुका कधीही, कामाला लागा : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यात कधीही विधानसभेच्या निवडणुका लागण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांनी राज्यात मध्यावधी निवडणुका होणार असल्याचं भाकीत वर्तवलं आहे. तसेच कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे राज्यात मध्यावधी निवडणुका होणार का? याची जोरदार चर्चा रंगली आहे.

ठाकरे गटाच्या शिवसेनेचा आज विधानसभा संपर्क प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. उद्धव ठाकरे यांनी या बैठकीला संबोधित केलं. यावेळी उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या



कामाला लागण्याचे आदेश दिले. राज्यात मध्यावधी निवडणुका कधीही होऊ शकतात. त्यामुळे कामाला लागा, असं उद्धव ठाकरे म्हणाल्याचं सूत्रांनी सांगितलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याला प्रकल्प देण्याची घोषणा केली आहे. निवडणुका आल्यावरच अशा घोषणा केल्या जातात. त्यामुळे केंद्राकडून ही घोषणा करण्यात आली असून याचा अर्थ राज्यात निवडणुका लागू शकतात, असंही उद्धव ठाकरे यांनी विधानसभा संपर्क प्रमुखांना सांगितल्याचं समजतं.

दरम्यान, खासदार अरविंद सावंत यांनीही उद्धव ठाकरे यांच्या या संकेताला दुजोरा दिला आहे. २०१४ पूर्वी गुजरात आणि हिमाचल प्रदेशच्या निवडणुका एकाचवेळी झाल्या होत्या. पण २०१२ नंतर विधानसभेची निवडणूक लागली. तेव्हा हिमाचल प्रदेशची निवडणूक आधी झाली. नंतर गुजरातची झाली. मधल्या काळात बऱ्याच घोषणा

.../२

# जनवादी महिला संघटनेतर्फे संभाजी भिडे यांच्या वक्तव्याचा जळजळीत निषेध

**दै.रायगड नगरी । उरण**

संभाजी भिडे वेळोवेळी अत्यंत बेताल, स्त्री–विरोधी आणि प्रतिगामी वक्तव्ये करीत असतात. त्यांना महत्व देण्याची खरं तर काहीच गरज नाही. पण काळ सोकावतो, म्हणून त्या वक्तव्यांचा समाचार घेणे आवश्यक आहे.असे मत उरण मधील महिला सामाजिक कार्यकर्त्या तथा जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष हेमलता पाटील यांनी व्यक्त केले आहे.



एका महिला पत्रकाराला तू टिकली लाव, मग तुझ्याशी बोलतो. कारण मी तुला भारतमाता समजतो आणि भारतमाता विधवा नव्हती असे अत्यंत उद्दाम, अस्थानी आणि महिलांच्या सन्मानाला ठेच पोहोचवणारे वक्तव्य संभाजी भिडे यांनी केल्याबद्दल जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कमिटीने त्यांचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. त्याचबरोबर राज्य महिला आयोगाने त्याची तातडीने दखल घेतल्याबद्दल आयोगाचे जनवादी महिला संघटनेने आयोगाचे आभार मानले आहेत.

मुळात भारतमातेची भिड्यांची संकल्पना हीच अत्यंत बुरसटलेली आहे. भारतमाता ही काही शालू आणि सौभाग्य लेणे परिधान केलेली पारंपरिक महिला नाही, तर ती या देशातील जनता आहे.

.../२

# राज्यात यंदा कडाक्याची थंडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईसह महाराष्ट्राला झोडपून काढणारा पाऊस केव्हाच हद्दपार झाला असून, आता थंडी वाढणार आहे. हवामान तज्ज्ञांकडून वर्तविण्यात आलेल्या अंदाजानुसार नोव्हेंबर महिन्यात पाऊस ओढ देणार असतानाच कडाक्याची थंडी पडणार आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत सरासरीच्या तुलनेत किमान तापमान खाली घसरणार आहे. त्यामुळे यंदाचे वर्षे पुन्हा एकदा हुडहुडीचे ठरणार आहे.

उबदार कपडे पुन्हा बाहेर काढावे लागणार आहेत. नोव्हेंबर महिन्याचा विचार करता धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांत दरवर्षी पडणाऱ्या सरासरी पावसापेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. जळगाव, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, पुणे, रत्नागिरी, सातारा, सांगली या जिल्ह्यांत दरवर्षी पडणाऱ्या सरासरी

.../२

# इम्रान वाचले; पाकिस्तानचे काय?

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावरील गोळीबार हा एका अर्थाने पाकिस्तानच्या अंतर्गत स्थैर्यावर आणि लोकशाहीवर झालेला गोळीबार आहे. पाकिस्तानचा विचार करताना लष्कर आणि आयएसआय यांना बाजूला ठेवता येत नाही. इम्रान खान यांनी 'हकीकी आझादी' म्हणजे 'प्रत्यक्षातले, खरेखुरे स्वातंत्र्य' मागणारा लाँग मार्च काढला आहे. त्याला मिळणारा तरुणाईचा प्रतिसाद अभूतपूर्व आहे. इम्रान यांना पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सरकार तर नकोच आहे; पण त्यांना देशाच्या कारभारातला लष्कर व आयएसआय यांची भूमिकाही मर्यादित करायची आहे. ही भाषा तरुणाईला भुरळ घालणारी असली तरी पाकिस्तानी सत्तावास्तव किती गुंतागुंतीचे आहे, हे इम्रान यांच्यावर झालेल्या गोळीबारातून दिसले. हा गोळीबार म्हणजे इम्रान यांना दिलेला इशारा आहे. या हल्लेखोराने किंवा त्याच्या नियंत्यांनी ठरवले असते तर हा हल्ला प्राणघातक ठरला असता. तसे झालेले नाही. या हल्ल्यानंतर रुग्णालयातून दिलेल्या निवेदनात इम्रान यांनी हा लाँग मार्च चालूच राहील, इस्लामाबादला पोहोचेल आणि शरीफ सरकारचा राजीनामा मागेल, असे म्हटले आहे. तसे खरोखर होते का आणि हा लाँग मार्च राजधानीत पोहोचण्याआधीच लष्कर बराकीतून बाहेर पडते का, हा कळीचा प्रश्न आहे. इम्रान खान हे एकेकाळी लष्कराचे लाडके होते. शरीफ आणि भुत्तो या अनेक दशके प्रभावी राहिलेल्या दोन कुटुंबांकडून सत्ता काढून घेण्यासाठी लष्कराने त्यांचा खुबीने वापर केला. मात्र, पंतप्रधान होताच इम्रान यांचे लष्कर व आयएसआयही संबंध बिनसले. त्याची जबर किंमत त्यांना मोजावी लागली. आज पाकिस्तानी जनमत झपाट्याने शरीफ सरकारच्या विरोधात जाते आहे. मात्र, त्याचे एक कारण आर्थिक शिस्त हे आहे. पाकिस्तानवर एकीकडे दिवाळखोरीचे संकट आहे; तर दुसरीकडे दहशतवाद्यांना पाठिशी घातल्याबद्दल होणारी संभाव्य आंतरराष्ट्रीय आर्थिक कारवाई आहे. या दोन्हीतून वाट काढत शरीफ सरकार धडपडते आहे. मात्र, युक्रेनजन्य जागतिक आर्थिक संकटाचा फटका तेथेही बसला. किमती वाढल्या. बेरोजगारी प्रचंड आहे. हा सारा असंतोष आपल्या शिडात भरून इम्रान खान 'त्वरित निवडणुका घ्या' असा आग्रह धरून बसले आहेत. पाकिस्तानात आठ ते दहा महिन्यांनी सार्वत्रिक निवडणुका अपेक्षित आहेत. मात्र, इम्रान यांच्या आग्रहाने त्या आधी झाल्या तर त्यांच्या तहरीक-ए-इन्साफ पार्टीला स्पष्ट बहुमत मिळू शकते. असे झाले तरी इम्रान आर्थिक संकटावर काय उपाय काढणार, हा प्रश्नच आहे. याबाबत, त्यांची आधीची कामगिरी फारशी स्पृहणीय नाही. निवडणुका ठरल्याप्रमाणे झाल्या आणि लंडनमध्ये सध्या परागंदा आयुष्य जगणारे नवाझ शरीफ यांच्यावरची कायदेशीर तलवार दूर झाली, तर 'पाकिस्तान मुस्लिम लीग'ला पुन्हा बहुमत मिळू शकते. नवाझ शरीफ मायदेशी परतू शकतात. मात्र, इम्रान तोवर थांबण्यास तयार नाहीत. आता हल्ल्यातून बाहेर येऊन ते जखमी पायांनी पुन्हा मोर्चात येतील, तेव्हा त्यांची लोकप्रियता आकाशाला भिडलेली असेल. इम्रान यांच्या मागण्या फेटाळून आंदोलन मोडून काढणे; याचा अर्थ शेकडो निरपराध पाकिस्तानी नागरिकांचा बळी घेणे, असा होतो. हे लष्कर करेल का? लष्करप्रमुख कमाल बाज्वा हे या महिनाअखेर निवृत्त होत आहेत. त्यांनीच या आधी इम्रान खान हे पंतप्रधान असताना त्यांना 'तुम्ही आता राजीनामा द्या' असा निर्णायक निरोप दिला होता. 'आपल्याला राजकीय महत्त्वाकांक्षा नाही..' असेही जनरल बाज्वा म्हणत असतात. मात्र, सगळे लष्करशहा असेच म्हणतात. जनरल झिया तीन महिन्यांसाठी आले होते. ते पुढे ११ वर्षे विमान स्फोटात मरेपर्यंत अध्यक्ष राहिले. तेव्हा उद्या देशातील निर्नायकीचे आणि अराजकाचे निमित्त सांगून लष्कराने सत्ता ताब्यात घेतली तर आश्चर्य वाटायला नको. आज जगात इतके संघर्ष चालले आहेत की, पाकिस्तानी लोकशाही वाचविण्यासाठी कोणीही धावून येण्याची शक्यता नाही. किंबहुना, लष्करशहा हे महासत्तांना हाताळण्यासाठी अधिक सोपे असतात. इम्रान खान यांनी तरुणाईला शरीफ आणि भुत्तो या दोन राजघराण्यांच्या बाहेरचा तेज-ताजा पर्याय दिला. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचेही गंभीर आरोप नाहीत. तरी राज्यशकट हाकण्याइतकी आर्थिक तसेच राजकीय परिपक्वता इम्रान यांना दाखवता आलेली नाही. परराष्ट्र आणि विशेषत: भारतधोरणातही ते जुन्या चौकटीतून बाहेर पडू शकले नाहीत. इस्लामी कट्टरतावाद्यांचे लांगूलचालन करतानाही त्यांना मर्यादा ओलांडली. अशा स्थितीत इम्रान यांच्यावरचे प्राणसंकट टळण्याइतकेच पाकिस्तानवरचे अराजकाचे संकट टळणेही फार महत्त्वाचे आहे. आज पाकिस्तानी आकाशात अराजक घोंघावते आहे. जखमी इम्रान जसजसा प्रवास करतील; तसतसे हे अराजक जवळ येईल. पाकिस्तान या एका फसलेल्या ऐतिहासिक प्रयोगातील हा नवा, काळा अध्याय असू शकेल.

# पथविक्रेत्यांवर कारवाईची टांगती तलवार ; राष्ट्रीय फेरीवाला धोरण कागदावरच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा वसाहतीमध्ये राष्ट्रीय परिवारा धोरण राबवले गेलेले नाही. त्याचबरोबर पथविक्रेत्यांना पर्यायी जागा सुद्धा उप-लब्ध करून देण्यात आलेली नाही. असे असताना त्यांच्यावर महापालिकेकडून कारवाई करण्यात येत आहे. अतिक्रमण विरोधी मोहिमेमध्ये सातत्य राहील असा इशारा प्रशासनाने दिला आहे. यावर माजी उपमहापौर सिताताई पाटील यांनी अक्षेप घेतला आहे. अगोदर पुनर्वसन आणि पर्यायी जागा द्या अशी मागणी त्यांनी केले आहे.

खांदा वसाहतीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून भाजी, फळे, खाद्यपदार्थ, मासळी, हार फुले त्याचबरोबर पूजाचे साहित्य आणि इतर संसारोपयोगी वस्तू विक्री करून शेकडो जण आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. संबंधित फेरीवाल्यांचे सर्वेक्षण होऊन सुद्धा अनेक वर्ष उलटले आहे. त्यानंतर महानगरपालिकेची स्थापना झाली. परंतु राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार संबंधितांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. सेक्टर ८ येथील भूखंडावर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत इमारती बांधण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे या भूखंडा लगत व्यवसाय करणाऱ्यांवर सिडकोने कारवाई केली. पदपथाच्या कडेला बसून हे विक्रेते व्यवसाय करीत आहेत. परंतु त्यांच्यावर सातत्याने महानगरपालिकेकडून कारवाईची टांगती तलवार उगरली जात आहे. नियमानुसार संबंधितांचे पुनर्वसन व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून सिताताई पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. सिडकोने इतर वसाहतीमध्ये हॉकर्स प्लाझा आरक्षित जागेवर बांधले आहेत. त्याचबरोबर रोज बाजारासाठी जागा सुद्धा देण्यात आलेल्या आहेत. मात्र खांदा वसाहतीला प्राधिकरणाने सापत्न वागणूक दिलेली आहे. त्याचबरोबर पनवेल महानगरपालिकेकडून या पथविक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. वास्तविक पाहता पथविक्रेत्यांना अद्यापही पर्यायी जागा महापालिकेकडून देण्यात आली नाही. त्यांचे राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार पुनर्वसन करण्यात आले नाही. असे असताना संबंधितांवर कारवाई करणं हे अन्यायकारक असल्याचे मत सिताताई पाटील यांनी व्यक्त केले आहे. यासंदर्भात माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी महासभेमध्ये उपसूचना सुद्धा मांडली होती.

त्यानुसार खांदा वसाहतीतील पथविक्रेत्यांना पर्यायी भूखंड देणे क्रमप्राप्त आहे. परंतु तसे न करता फक्त कारवाईचा बडगा उगारणे अत्यंत चुकीचे असल्याचे पाटील म्हणाल्या.

# मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे शिघ्रे येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे दि.३१ ऑक्टोबर ते दि.१३ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत मुरुड तालुक्यात विविध ठिकाणी कायदेविषयक मार्गदर्शनपर शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्याचाच भाग शिघ्रे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत कायदेविषयक मार्गदर्शनपर शिबिर संपन्न झाले.

मुरुड न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड.संजय राठोड, ॲड.मोहन तांबडकर, ॲड.डी.एन.पाटील, ॲड. कुणाल जैन, ॲड.रुपेश पाटील, ॲड. खानविलकर, न्यायालयीन कर्मचारी जयेश गुरव, ओमकार इंगळे, प्राथमिक शाळेतील शिक्षक विद्यार्थी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी सरकारी वकील ॲड.संजय राठोड यांनी मुलांचे कायदे व हक्क याबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले तर ॲड.मोहन तांबडकर यांनी कायदेविषयक मार्गदर्शनपर माहिती दिली.

# म्हसळ्यामध्ये नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर; सहभागी होण्यासाठी युवकांना आवाहन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हाधिकारी तथा नियंत्रक नागरी संरक्षण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी संरक्षण रायगड यांच्यातर्फे दि.१५ नोव्हेंबर ते दि १९ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत म्हसळा येथील एस.टी.स्टँड घनसार हॉलमध्ये सकाळी ११.०० वाजता नागरी संरक्षण : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उदघाटन तहसीलदार समीर घारे यांच्या शुभहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

नागरी संरक्षण ही देशातील सामान्यलोकांची संघटना आणि प्रशिक्षण आहे जेणे करून सशस्त्र दल, वैद्यकीय सेवा किंवा पोलिस दलाला मदत करू शकतील, देशावर शत्रूने हल्ला केल्यास.नागरी संरक्षण उपाय तात्काळ आणीबाणीच्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी, जनतेचे संरक्षण करण्यासाठी आणि आपत्ती मुळे नष्ट झालेल्या किंवा नुकसान झालेल्या महत्त्वपूर्ण सेवाआणि सुविधा पुनर्संचयित करण्यासाठी डिझाइन केले आहे.२४ ऑक्टोबर १९४१ रोजी भारतात सर्वप्रथम नागरी संरक्षणाची स्थापना करण्यात आली. संसदेने मे १९६८ रोजी नागरी संरक्षण कायदा २७,१९६८ म्हणून लागू केला.

नागरी संरक्षणाची उद्दिष्टे, जीव वाचवण्यासाठी, मालमत्तेचे नुकसान कमी करण्यासाठी, उत्पादनात सातत्य राखण्यासाठी, जनतेचे उच्च मनोबल राखणे, नागरी संरक्षणाच्या सेवा नागरी संरक्षणात १२ सेवा आहेत.यात मुख्यालय सेवा, संप्रेषण सेवा,वॉर्डन सेवा,अपघाती सेवा,अग्निशमन सेवा,प्रशिक्षण सेवा, बचाव सेवा,डेपो आणि वाहतूक सेवा, पुरवठा सेवा,बचाव सेवा यांचा यात समावेश आहे.

या पाच दिवसीय शिबीराबाबत अलिबाग येथील के.डी.पाटील,के.आर कुरकुटे (सउनि), शिरसाठ (सउनि), तुफैल दामाद यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. नागरी संरक्षण दलात भरती होण्यासाठी म्हसळा तालुक्यातील वय वर्षे १८ पूर्ण करणाऱ्या सर्व युवक युवती, सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी शिबिराचा लाभ घ्यावा.असे निमंत्रक डॉ.मुबश्शिर जमादार, किशोर मोहिते,अ.श.घनसार यांनी निमंत्रणाद्वारे कळविले असून नावनोंदणी व अधिक माहितीसाठी मुबश्शीर जमादार : मोबाईल नंबर ९४२३२४१७८४ व तुफैल दामाद : मो.नं. ९२७०५१२८५८ यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहन करण्यात आले आहे.

# फ्लेमिंगो पक्षी नवीन शेवाच्या खाडीत

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्याच औद्योगिकीकरण झपाट्याने होत असल्याने पाणथळ जागांचा ऱ्हास होत आहे.त्यामुळे देश परदेशातील फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींच्या पक्षांनी आपला मोर्चा हा नवीन शेवा, भेंडखळ ग्रामपंचायत परिसरातील पाणथळ जागांवर वळविला असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

फ्लेमिंगो म्हणजे रोहित पक्षी हे पक्षी अफगाणिस्तान,इराण, इस्त्रायल मधून मोठ्या संख्येने देशातील विविध पाणथळ जागांवर हिवाळ्याच्या दिवसांत दरवर्षी येतात.

त्यातील बरेचसे फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींचे पक्षी हे हजारो मीटरचा प्रवास करत नवीमुंबई व उरणच्या पाणथळ जागांवर येतात.परंतु या परिसराचा कायापालट झपाट्याने होत असल्याने पाणथळ जागांचा ऱ्हास होत आहे.

त्यामुळे हिवाळ्याच्या दिवसांत जेएनपीटी बंदराच्या परिसरात मोठ्या संख्येने आढळून येत असलेल्या फ्लेमिंगोच्या संख्येत घट होत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या उरण तालुक्यातील नवीन शेवा व भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील पाणथळ जागांवर फ्लेमिंगो पक्ष्यांबरोबर इतर विविध जातींच्या पक्षांची रेलचेल सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.एकंदरीत अशा फ्लेमिंगो इतर विविध जातींच्या पक्षांच्या मुक्त संचारामुळे पक्षी प्रेमींना पर्वणी ठरत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बोर्लीपंचतनमध्ये खड्डे बुजवायला तात्पुरती मलमपट्टी

प्रदूषणाबाबत गांभीर्याने पावले उचललेली दिसत आहेत. मात्र, खड्डे बुजवण्याचा अशा अजब प्रकाराने मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जात आहे. या प्रक्रियेत खड्ड्यांना खडी डांबरचे पक्के पॅच न मारल्याने संपूर्ण रस्त्यावर खडी पसरून मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट तयार होतात. त्यामुळे या रस्त्याशेजारून जाणाऱ्यांना याचा त्रास होतो. पण, याची काळजी घेतली जात नाही. त्यानंतर कामगार इतक्या वेगाने खड्डे बुजवतात. या ठिकाणी ठेकेदार किंवा व्यवस्थापक हजर नसल्याचे आढळतात.

## मध्यावधी निवडणुका कधीही, कामाला लागा : उद्धव ठाकरे

झाल्या. घोषणा झाल्या आणि निवडणुका लागल्या. आताही तेच होण्याची शक्यता आहे, असं अरविंद सावंत म्हणाले.

राज्यातील अनेक प्रकल्प पळवले. नंतर सव्वा दोनशे कोटीचे प्रकल्प राज्यासाठी जाहीर केले. त्यातील काही प्रकल्प राज्यातीलच आहेत. हे सर्व प्रकल्प हवेतील आहेत. पण असे प्रकल्प जाहीर करतात तेव्हा निवडणुका लागण्याची संकेत असतात. अशी प्रलोभने दाखवायची आणि आम्ही हे केले, ते केले म्हणून सांगायचं ही पद्धत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी मध्यावधीचे संकेत दिले आहेत, असं सांगतानाच मध्यावधी निवडणुकीशिवाय पर्याय नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

आमदार मनिषा कायंदे यांनीही त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पक्षाचे महत्त्वाचे निरोप असतात ते मातोश्रीतून जात असतात. बाळासाहेब ठाकरे हे सुद्धा असे संकेत देत असत. हे संकेत संपर्क प्रमुख मतदारसंघात देत असत. तसेच विधानसभा मतदारसंघातील छोट्यातील छोटी घडामोड पक्षप्रमुखांकडे पोहोचवली जाते. ती पद्धत गेल्या ५० वर्षापासून सुरू आहे, असं मनिषा कायंदे म्हणाल्या.

शिवसैनिक २४ तास काम करत असतात. निवडणुका आल्यावरच आमच्या शाखा उघडतात असं नाही. काही लोकांच्या शाखा आणि टपऱ्या केवळ निवडणुका आल्यावरच उघडतात. आमचं तसं नाही. त्यामुळे आम्ही कोणत्याही प्रसंगासाठी तयारच आहोत, असं सूचक विधानही कायंदे यांनी केलं.

## जनवादी महिला संघटनेतर्फे संभाजी भिडे यांच्या वक्तव्याचा जळजळीत निषेध

टिकली हे एक सौंदर्य प्रसाधन आहे आणि ती लावायची की नाही हा प्रत्येक महिलेचा वैयक्तिक प्रश्न आहे. विधवेने टिकली लावू नये, हे सांगणारे हे कोण टिकोजी? ज्या परंपरांचा आणि संस्कृतीचा भिडे आणि संघाची तत्सम मंडळी अभिमान बाळगतात त्या संस्कृतीतील अगदी झाशीच्या राणीपासून ते जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, ताराराणी या महिलांनी वैधव्यकाळात दाखवलेले कर्तृत्व आपण नाकारतो का, हे या भिडे महाशयांनी स्पष्ट करावे, अशी मागणी जनवादी महिला संघटनेने केली आहे. ज्या भाजप-संघाच्या सत्तेचे पाठबळ असल्यामुळे असली बेताल भाषा भिडे वापरतात, त्या सत्ताधाऱ्यांना आणि त्यांच्या वर्तुळातील महिलांना असले काही ऐकवण्याची हिंमत भिड्यांची आहे का ?

भिड्यांच्या या वक्तव्याला अनेक महिला पत्रकार, सुजाण नागरिक आणि संघटनांनी केलेला तीव्र विरोध हा महाराष्ट्र पुरोगामी आहे आणि महिलांच्या स्वातंत्र्याचा आदर करणारा आहे, हे सिद्ध करतो. पण दुसरीकडे, एरव्ही वाचाळ असणारा गोदी मीडिया आणि भाजपच्या महिला नेत्या या मुद्द्यावर मूग गिळून बसले आहेत.

केवळ विधवा महिलांचाच नव्हे तर समस्त महिला वर्गाचा अपमान करणाऱ्या, त्यांचे स्थान त्यांच्या वैवाहिक स्थितीवरून ठरवणाऱ्या तसेच भारतातील 'टिकली न लावणाऱ्या' सर्वधर्मीय कर्तृत्ववान महिलांचे समाजातील योगदान नाकारणाऱ्या या स्वघोषित गुरुजींनी देशाची माफी मागावी अशी मागणी जनवादी महिला संघटनेच्या वतीने नसीमा शेख अध्यक्ष, हेमलता पाटील राज्य उपाध्यक्ष,प्राची हातिवलेकर सरचिटणीस यांच्यासह जनवादी महिला संघटना, महाराष्ट्र राज्य कमिटीच्या महिला पदाधिकारी व सदस्यांनी केली आहे.

## राज्यात यंदा कडाक्याची थंडी

पावसापेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे, थोडक्यात नगण्य म्हणजे जवळपास पाऊस पडण्याची शक्यता नाही. सोलापूर व उर्वरित मराठवाडा व संपूर्ण विदर्भातील १८ जिल्ह्यांत मात्र दरवर्षीच्या नोव्हेंबरमधील सरासरी पावसापेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात दुपारी ३ वाजेचे कमाल तापमान हे दरवर्षी असणाऱ्या सरासरी कमाल तापमानापेक्षा अधिक असेल. ही शक्यता ५० टक्के आहे. मात्र खूप ऊन पडणार नसले तरी दुपारचे तापमान उबदार असणार आहे. मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर व विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांत पहाटे ५ वाजेचे किमान तापमान नोव्हेंबर महिन्यात दरवर्षी असणाऱ्या सरासरी किमान तापमानापेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. थोडक्यात किमान तापमान हे सरासरीपेक्षा खूप खालावण्याची शक्यता आहे. याचा अर्थ तेथे चांगलीच थंडी जाणवणार आहे. उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रातही पहाटे पाचचे किमान तापमान हे नोव्हेंबर महिन्यात दरवर्षीच्या सरासरी किमान तापमानापेक्षा कमीच असण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथेही थंडी जाणवणार आहे.

# श्रीवर्धनमध्ये कधी मिळणार आनंदाचा शिधा ? दिवाळी उलटून आठ दिवस झाले तरीही लाभार्थी वंचित

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

दिवाळी संपली तरीही जिल्यातील श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात सरकारतर्फे शंभर रुपयात देण्यात येणारा आनंदाचा शिधा पोचलाच नाही. लाभार्थ्यांना हा शिधा न मिळाल्याने या लाभार्थ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. आता काय पुढल्या दिवाळी ला आनंदाचा शिधा मिळेल का असर्व खोचक सवाल आता विचारला जातोय.

दिवाळी निमित्त सरकारमार्फत अंत्योदय व प्राधान्यक्रम शिधा पत्रिकाधारकांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेत चणाडाळ, तेल, रवा व साखर प्रत्येकी एक किलो फक्त १०० रुपयात देण्यात येणार होती. परंतु, तालुक्यातील दुकानात अद्यापही हा आनंदाचा शिधा पोचलाच नाही. स्वस्त धान्य दुकानातून सरकारमार्फत अंत्योदय व प्राधान्यक्रम सिधापत्रिका धारकांना शंभर रुपयांमध्ये या चार वस्तूंचे वाटप दीपावलीनिमित्त केले जाणार होते होते. दोन्ही तालुक्यात साधारणपणे पन्नास हजारांच्या आसपास लाभार्थी आहेत.

काही ठिकाणी तेल आणि साखर आली असल्याची माहिती दुकानदारांनी दिली व डाळ आणि रवा असे जिन्नस अद्यापही मिळाले नाही.


एकत्र किट ची किंमत शंभर रुपये आहे. पुरवठा विभागाकडू आम्हाला वाटप साठी कोणत्याही सूचना दिल्या नाही. दोन पदार्थ वाटायला सांगितले तरी ते मशीन मधून अंगठा द्वारे देता येण्यास अडचणी येतील त्यामुळे आम्ही इतर पदार्थ येण्याची वाट पाहत असल्याची माहिती शिधावाटप दुकानदारांनी दिली.

दिवाळी उलटून आठवडा झाला तरीही आनंदाचा शिधा न पोचल्याने या परिसरातील लाभार्थींमध्ये नाराजी आहे. यवतमाळ च्या वितारकाकडे राज्यातील हे शिधा वाटप देण्याचे कंत्राट दिल्याची माहिती मिळत आहे व त्यामुळे रायगड ला वितरणासाठी उशीर झाला मात्र हे विभागीय पातळीवर कंत्राट दिले असते तर दिवाळी नंतर देखील वाटपाची प्रतीक्षा टाळता आले असते.

# कोनायसन्स स्कुलच्या स्वरा पवारची राष्ट्रीय स्पर्धेत निवड

## कोल्हापूर येथील राज्यस्तरीय स्पर्धेत १ गोल्ड, १ सिल्व्हर व ११ ब्राँझ मेडलची कमाई

**दै.रायगड नगरी । पेण**



एनव्हीजी एज्युवेंचर्स फाउंडेशन पेणच्या कोनायसन्स स्कुलमधील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या स्वरा मंगेश पवार या विद्यार्थिनीची कन्याकुमारी येथे होणाऱ्या थांग-ता या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत स्कुलच्या विद्यार्थ्यांनी १ गोल्ड, १ सिल्व्हर व ११ ब्राँझ मेडल पटकाविले आहेत.

कोल्हापूर येथे नुकत्याच झालेल्या २६ व्या राज्यस्तरिय थांग-ता स्पर्धेत पेणच्या कोनायसन्स स्कुलला दैदिप्यमान यश प्राप्त झाले असून या स्पर्धेत १ गोल्ड, १ सिल्व्हर व ११ ब्राँझ मेडलची कमाई झाली आहे.

या स्पर्धेत इयत्ता आठवीत शिकणाऱ्या स्वरा मंगेश पवार हिने गोल्ड मेडल, विराज विशाल मोकल याने सिल्व्हर मेडल जिंकले असून दूर्वा देवा पेरवी, दिशा प्रकाश गुरव, युवराज शशिकांत भगत, यदर्थी योगेश पाटील, गायत्री सुशील कारखानीस, स्वरूपा महेश चौधरी, आयुष सुहास पाटील, राजविर योगेंद्र देशमुख, कुशल अनिल सिंग, पुष्कर गणेश म्हात्रे, निल धनंजय पाटील यांनी ब्राँझ मेडल पटकाविले आहेत.

गोल्ड मेडल जिंकलेल्या स्वरा पवार या विद्यार्थीनीची कन्याकुमारी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्कुल क्रीडा शिक्षक आदित्य तेरेद-`साई यांनी कोल्हापूर येथे झालेल्या स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.

वरील सर्व विद्यार्थ्यांचे एनव्हीजी एज्युवेंचर्स फाउंडेशनचे संचालक ॲड.मंगेश नेने, डॉ.मनीष वनगे, ॲड.तेजस्विनी नेने, डॉ.सोनाली वनगे, प्रकाश गुरव, शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया विखणकर, क्रीडा शिक्षक आदित्य तेरेदेसाई व सर्व शिक्षकवृंद यांनी कौतुक केले आहे. तसेच स्वरा पवार या विद्यार्थिनीला कन्याकुमारी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरण येथील यु.ई.एस. स्कूलमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील यु.ई.एस. स्कूल आणि उरण तालुका विधी सेवा समिती तसेच उरण तालुका वकिल संघटना यांच्या संयुक्त विद्यामानाने यु.ई.एस. स्कूलच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी सकल भारत कायदेविषयक जनजागृती अभियानांतर्गत नागरिकांचे सक्षमीकरण' आणि 'हक हमारा भी तो है ७५' ह्या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात होते.

व्यासपीठावर यु.ई.एस. संस्थेचे विश्वस्त सदस्य व माजी अध्यक्ष ड. राजेंद्र भानुशाली, उरणचे कनिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश एन. एम. वाली, आणि उरण बार असोशिएशनचे वकिल वर्ग , सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सौ. सोनाली म्हात्रे, स्कूल ण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सौ. सिमरन दहिया तसेच माध्यमिक विभागातील सुपरवायझर व शिक्षक उपस्थित होते. ॲड. राजेंद्र भानुशाली आणि ॲड. रोशनी बारे तसेच श्री. एन. एम. वाली, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उरण ह्यांनी भाषणाद्वारे बाल हक्क कायदा या विषयावर उपस्थित विद्यार्थांना मौल्यवान असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माध्यमिक विभागातील सुपरवायझर सौ. योगिता चौधरी यांनी केले.

## माजी नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या पाठपुराव्या मुळे रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये दरवर्षी अतिवृष्टीमुळे रस्त्यांची नेहमीच वाताहत होत असते. लाल मातीच्या रस्त्यावरून पावसाळी पाणी वाहून जात असल्यामुळे महत्वाच्या पॉईंट भागातील रस्त्यांचे दगडगोटे वर आलेले होते त्यामुळे हातरीक्षा चालकांना तसेच दूरवर असणाऱ्या ज्या महत्त्वाच्या पॉईंटवर ठराविक घोडेवाले पर्यटकांना मुख्य पॉइंट्स दाखवत असतात त्यांना या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते.

याकामी माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदेंनी दि.२ नोव्हेंबर रोजी नगरपरिषदेच्या कार्यक्षम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे(शिंदे ) यांना लेखी निवेदन सादर केले होते. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे रस्त्यावर जे काही दगडगोटे वर आलेले आहेत त्यामुळे इथल्या कष्टकरी हातरीक्षा चालक आणि घोडेवाल्यांना खूपच त्रासदायक बनले आहे यासाठी हे सर्वच रस्ते पूर्ववत करण्यात यावेत.

जेणेकरून प्रवास करताना कुणालाही इजा अथवा अपघात होऊ नये यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून युद्धपातळीवर रस्त्यांची कामे मार्गी लावावीत त्यानुसार सुरेखा भणगे यांनी ताबडतोब आपल्या कामगारांना सूचना देत या महत्वपूर्ण कामांना सुरुवात केली आहे.त्यामुळे सर्व कष्टकरी ,श्रमिकांनी माजी नगरसेवक शिवाजी शिंदे आणि प्रशासक सुरेखा भणगे यांचे आभार मानले आहेत.



### जाहीर नोटीस

मा.राव साहेब

ॲड.दिपक म. ठाकूर

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३४३/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२०/०४/२०२२

कै.दत्तात्रय उर्फ दत्तात्रेय फकीरचंद बांदोडकर (मयत) यांचे वारस
श्रीम.अनघा अनिल पेडणेकर
उ.व.५१, धंदा : गृहिणी
रा.प्लॉट नं.के-३०२, शिवम को.ऑ.सौ.विचुंबे,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

अर्जदारचे वडील कै.दत्तात्रय उर्फ दत्तात्रेय फकीरचंद बांदोडकर हे दि.१५/११/२०१८ रोजी मौजे : रुम नं.१-४, सी ६/सिडको कॉलनी, से-१७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नावे व मालकीची मौजे : न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील रुम नं.१-४, सी ६/ सिडको कॉलनी, से-१७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या इमारतीमधील, पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.१-४, ज्यांचे क्षेत्र-५४.०३ चौ.मी. बिल्टअप अशा वर्णनाचा फ्लॅट होता व आहे. सदर मिळकती संदर्भात कै.दत्तात्रय उर्फ दत्तात्रेय फकीरचंद बांदोडकर यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच त्याचा वारसदार म्हणून घोषित करून अर्जदारांच्या नावे वारसदाखला मिळावा यासाठी मे.न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै.दत्तात्रय उर्फ दत्तात्रेय फकीरचंद बांदोडकर यांच्या वारसाहक्कासंबंधी अन्य कुणाचीही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तींनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत स्वतः अगर वकीलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदाराने दिलेला पुरवा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि. / /२०२२ रोजी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# हर्षा शिंदे हिची गगन भरारी मलेशियामध्ये होणाऱ्या मिसेस व मिसचे प्रतिनिधित्व करणार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानची कन्या असलेल्या कुमारी हर्षा विनोद शिंदे हिने मिस हेरिटेज इंडिया हा किताब पटकवल्यानंतर आता ती थेट पुढील पंधरा दिवसांमध्ये मलेशिया येथे होणाऱ्या मिसेस व मीस हेरिटेज इंटरनॅशनल स्पर्धेत मिस गटाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी कुमारी हर्षा विनोद शिंदे हीस मिळाली असून आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानची कन्या हिच्या यशामुळे माथेरानचे नाव सात समुद्रा पलिकडे जाणार आहे.



१४ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत कौलालमपूर येथे होणारी स्पर्धा ही मिस व मिसेस युनिव्हर्स प्रमाणेच असून या स्पर्धेतील सादरीकरण मात्र वेगळे असते भारतामध्ये यश मिळवल्यानंतर आता तरुणांची आयडॉल असलेल्या हर्षा भारतीय परंपरा घेऊन थेट आंतरराष्ट्रीय मंचावरती त्याचे सादरीकरण करणार असल्याने तिला समस्त माथेरान मधून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, सिंगापूर येथील एका मोठ्या कंपनीचे प्रायोजकत्व प्राप्त असलेल्या या स्पर्धेसाठी मृणाल गायकवाड या भारताच्या संचालक म्हणून काम पाहत आहेत स्पर्धेत जगभरातील जवळपास तीस हून अधिक देशातील स्पर्धक सहभागी होणार असून त्यात प्रामुख्याने रशिया चीन जपान युक्रेन पाकिस्तान न्यूझीलंड सारख्या प्रगत देशांचा ही समावेश आहे.

माथेरान सारख्या दुर्गम ठिकाणी फॅशनच्या जगतामध्ये हर्षाला प्रोत्साहन देणाऱ्या श्री विनोद शिंदे व रेश्मा शिंदे या दांपत्यांचे ही सर्वत्र कौतुक होत असून व्यवसायने हॉटेल व्यवसायिक असलेले विनोद शिंदे यांनी हर्षा ची आवड ओळखून तिला तिच्या आवडत्या व्यवसायात करिअर करण्याची मुभा दिली त्यामुळेच हर्षा हिने बॅचलर ऑफ आर्किटेक मुंबई युनिव्हर्सिटी येथून घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी लंडन येथे जाऊन मास्टर इन आर्किटेक ॲंड डिझाईन चा अभ्यास पूर्ण केला २०२१ मध्ये तिला विनर ऑफ द मिस इंडिया व बेस्ट पर्सनॅलिटी विनर इन २०२१ हे किताबे मिळाले होते, आपल्या शिक्षण ना बरोबरच आपल्या आवडी सांभाळताना हर्षाने भरतनाट्यम वास्तु पेंटिंग, लेखन व निसर्ग पेंटिंग यामध्येही आपला हातखंडा दाखवून दिला आहे त्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावरती माथेरानची कन्या देशाचे प्रतिनिधित्व करणार असल्याने माथेरान तसेच कर्जत तालुक्यातून हर्षाने कैवतुक होत असून हर्षा नक्कीच याच्यात यक्ष प्राप्त करेल असे हर्षाची आई रेश्मा शिंदे यांनी सांगितले.

# रायगड जिल्ह्यातील पहिलेच पोलीस भरती प्रशिक्षण शिबीरास माणगांवात उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड पोलीस, पोलीस भरती मार्गदर्शन शिबिर दिनांक ५ नोव्हेंबर २०२२ रोजी माणगांव उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्फत माणगांव येथे आयोजित करण्यात आले. पहिल्यांदाच जिल्ह्यात, रायगडचे नवनियुक्त पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, यांच्या मार्गदर्शनात पोलीस प्रशासनाच्या वतिने अशा प्रकारचे पोलीस भरतीपूर्व तयारी आणि प्रोत्साहनपर शिबीर राबविण्यात आले. माणगांव, तळा, गोरेगांव मधिल जवळपास शेकडो प्रशिक्षणार्थींची लक्षणिय उपस्थिती होती. पोलीस भरतीची तयारी करत असणाऱ्या माणगांव, तळा, गोरेगाव तालुक्यातील सर्व मुला-मुलींना या प्रशिक्षण शिबीराचा लाभ मिळाला. हे शिबीर अशोक दादा साबळे हायस्कूल माणगाव येथे घेण्यात आले.



यावेळी रायगड पोलीस अधिकारी वर्गाकडून भरती बाबत मार्गदर्शन व्यायामाचे महत्त्व, भरतीपूर्वक कागदपत्र पडताळणी व माहिती व भरती प्रक्रिया जाहिरात, संवर्गप्रमाणे पोलीस भरती, उमेदवार विभागणी माहिती, शारीरिक चाचणी पात्रते बाबत मार्गदर्शन तसेच मैदानी परीक्षा बाबत तज्ञांचे मार्गदर्शन यामध्ये सोळाशे मीटर, शंभर मीटर धावणे, गोळा फेक, पोलीस भरती लेखी परीक्षा बाबत तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थींना चहा, नाश्ता व पाणी, भोजनाची व्यवस्था देखिल करण्यात आली होती. तसेच प्रशिक्षण शिबिरात विशेष काळजी घेत रुग्ण-वाहिका देखील सज्ज ठेवण्यात आली होती. हे शिबीर सहा.पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांचे मार्गदर्शनात यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील, तळा पो.नि. गोविंद ओमासे, सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीकृष्ण नावले व माणगांव पोलीसांनी खुप मेहनत घेतली.

तसेच महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील यांनी आपल्या खास शैलीत मुलांशी संवाद साधला, व भरतीला कसे सामोरे जावे या विषयी मार्गदर्शन केले. तसेच पोलीस निवास साबळे यांनी प्रत्यक्ष भरती प्रक्रियाच समजावुन दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश अस्वर यांनी मोलाचे मार्गदर्शन करीत सकाळी ९ ते दुपारी ३ वाजे पर्यंत शिबीराची संपूर्ण जबाबदारी पेलताना मुलांना अनेक बारकावे समजाविले. तळा तालुक्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक ओमासे यांनीही पोलीस भरतीची सुवर्णसंधी घ्या, व्यसन मुक्त, शिस्तबध्द राहुन आळस झटकुन पोलीस भरती व्हा! आपल्या वरिष्ठांचे आदेश पालन करुन प्रामाणिकपणे जनतेची सेवा करा! असा मोलाचा सल्ला दिला. या शिबिरात रायगड भूषण जेष्ठ पत्रकार रविंद्र कुवेसकर यांनीही पोलीसदल आणि शिस्त, सामाजिक जबाबदारी या विषयी खुमासदार संवाद साधला.

या शिबीरात पोलीस भरतीचे वेळी गोळाफेक कशी करावी याचे प्रात्यक्षकही पोलीस कॅडमी भरतीचे मार्गदर्शक परेश कोटकर, प्रितीश वाडकर, विद्या खिडबिडे यांनी शाळेच्या भव्य पंटागणात करुन दाखविले, प्रत्यक्ष गोळाफेकही घेण्यात आली. यामध्ये मुलिंचा उत्साह आणि उर्जा वाखाणण्याजोगी होती. मुलिंचीही 'हम भी कुछ कम नही' अशी तयारी पाहुन उपस्थित पोलीस अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. माणगांव, तळा, गोरेगांव मधिल जवळपास दोनशे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची लक्षणिय उपस्थिती दिसुन आली. पोलीस उप निरिक्षक अनंत पवार, सहा. उप निरिक्षक ज्ञानदेव ढोबळे, पो.शि. रामनाथ डोईफोडे, अनिल रिटे, सुग्रीव मुंडे, अमोल पोंधे, विकास ढाकणे यांनी विशेष मेहनत घेतली.

# मनसेच्या पदाधिकाऱ्याला जबर मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मनसेचे पनवेल उपशहर अध्यक्ष मनोज कोठारी यांना बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या मारहाणीत मनोज कोठारी जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कामोठे पोलिसांनी या प्रकरणात मिलिंद खाडे व त्याच्या तीन सहकाऱ्यांविरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. मनोज कोठारी हे कामोठे परिसरात राहण्यास आहे. त्यांना तीन महिन्यांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पनवेल उपशहर अध्यक्षपद मिळाले आहे. पहाटे ते मित्रांसह बी. के. धाबा येथे गाडीने गेले होते. त्या ठिकाणी मिलिंद हा मित्रांसह उभा होता. या वेळी त्यांनी कोठारी यांच्याकडे विचारपूस केल्यावर मिलिंद हा त्यांच्या अंगावर धावून गेला. या वेळी कोठारींचा मित्र प्रशांत धनावडे याने त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता, मिलिंद खाडे व त्याच्या तीन मित्रांनी गाडीमधील हॉकीस्टिक काढून कोठारी व प्रशांत यांना मारहाण केली.

# गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शारीरिक त्रासामुळे मानसिक तणावात येऊन एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. लक्ष्मण चेलगी (वय ४५) याने शारीरिक त्रासामुळे मानसिक तणावात येऊन गळफास घेऊन आत्महत्या केल्याने याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे : कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत घर मिळकतीचे मोबदल्यात शासनाच्या पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेनुसार १) कै.वासुदेव बाळकृष्ण पाटील, २) श्री.श्रीधर वासुदेव पाटील रा.मु.कोंबडभुजे, पो. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ यांस सिडकोकडून खालील घर मिळकतीचे मोबदल्यात मौजे : पुष्पक (उलवे) येथे भूखंड क्र.३०० सेक्टर २५ क्षेत्र ४७० चौ.मी. भूखंड वाटप करण्यात आलेला आहे.

**घर मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | युनिट केस क्र. | सर्वेक्षण क्र. | घर क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | कोंबडभुजे | KOM-ICIG-3 | KB-103<br>KB-104 | १८३, १८४ |

वरील भूधारकांपैकी कै.वासुदेव बाळकृष्ण पाटील हे दि.१७/१०/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात कायदेशीर वारस म्हणून दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल यांनी दि.चौ.अर्ज क्र.२९७/ २०२२ या वारस दाखल्यानुसार १) श्रीमती.मंजुला वासुदेव पाटील, २) श्री.मुरलीधर वासुदेव पाटील, ३) श्री.श्रीधर वासुदेव पाटील, ४) श्री.सचिन वासुदेव पाटील, ५) सौ.शुभांगी मधुकर म्हात्रे उर्फ शुभांगी वासुदेव पाटील यांचे नावाची नांद करण्यात आलेली आहे. परंतु १) श्री.मुरलीधर वासुदेव पाटील २) श्री.सचिन वासुदेव पाटील ३) सौ.शुभांगी मधुकर म्हात्रे उर्फ शुभांगी वासुदेव पाटील हे सदर भूखंडातील त्यांचा हिस्सा हक्कसोडपत्राने कायमस्वरुपी त्यांची आई व भाऊ १) श्रीमती.मंजूला वासुदेव पाटील व २) श्री.श्रीधर वासुदेव पाटील यांचे लाभांत करणार आहेत व तसा दस्त दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल यांचेकडे नोंदणीकृत करणार आहेत.

तरी सदर मिळकतीचे हक्कसोडपत्राबाबत हरकत असल्यास व त्यामधील कोणत्याही भागावर कोणाचा गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, जप्ती, कुळवहिवाट, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, देखभाल, साठेकरार, बायणा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असलेल्या व्यक्तींनी व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपला हक्क, हितसंबंध व अधिकाराचे लेखी पुरावे व कागदपत्रांसहीत आपल्या हक्काचे स्वरुप विषद करून खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाचीही काही हरकत, तक्रार व दावा वगैरे न आल्यास सदरहू भूखंड मिळकती मधील वरील वारसांचे अधिकार निर्वेध व बोजारहीत आहेत, असे समजण्यात येईल व सदर दस्तास कोणाचीही हरकत व तक्रार नाही असे समजण्यात येईल. व त्याअनुषंगाने माझे अशिल हक्कसोडपत्र नोंदवून घेतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या येणाऱ्या तक्रारी रद्दबातल समजून त्यांचा विचार केला जाणार नाही.

दि.०५/११/२०२२

सही/-

**ॲड.प्रशांत मनोहर भोईर**
**१०५, अनन्या क्रिस्टल, भूखंड क्र.३९५, से.२४, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९९६७३४३६९७ / ८६५५५३०७७७**

### जाहीर नोटीस

श्री.मुजावर सा़ो

ॲड.सुनील एन. मोरे

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५७४/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१३/१२/२०२२

१) सौ.कविता जयेश भोपी
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी.कविता तुळशीराम उलवेकर
वय : ३६ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.पो.वलप, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.सविता विवेक म्हात्रे
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी.सविता तुळशीराम उलवेकर
वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.पो.भाल, ता.पेण, जि.रायगड
३) कुमारी.निशा तुळशीराम उलवेकर
वय : २९ वर्षे, धंदा : घरकाम
रा.घर नं.१६५, मु.खिडूकपाडा, पो.नावडे,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ३ यांची आई कै.कमलाबाई उर्फ कमली तुळशीराम उलवेकर या दि.१५/०२/२०२२ रोजी मौजे : खिडूकपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले. कै.कमलाबाई उर्फ कमली तुळशीराम उलवेकर यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| रोडपाली | ८१ | ० | ०-०६-८ | १.५१ |
| रोडपाली | ३६४ | १ | ०-९-१२ | १.३८ |
| रोडपाली | १९७ | १ (२) | ०-१४-०<br>पो.ख. ०-००-३ | १.१२ |
| रोडपाली | १२१ | १ | ०-५२-८<br>पो.ख. ०-०३-८ | ५६.६ |
| रोडपाली | १२५ | १ | ०-१३-४ | २.०० |
| रोडपाली | ११९<br>१९७<br>१६६ | ०<br>१ (१)<br>० | ०-७६-४<br>पो.ख. ०-०२-०<br>०-४१-९<br>पो.ख. ०-००-५<br>०-८२-२<br>पो.ख. ०-०६-८ | २.५०<br>३.३२<br>१०.०६ |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.५/११/२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

मा.मुजावर सा़ो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.अनिकेत देशकर

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सा. (व) स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज नं.१४१३/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२९/११/२०२२

१) श्रीमती.खैरुनिसा शब्बीर भागवाणी
वय : ७३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.हुर पॅलेस, कोळीवाडा, वसई रोड,
गावदेवी मंदिराजवळ, वसई गाव, वसई ४०१२०१
२) सौ.फरजाना सलीम मेमन
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सलीम मंजील, हाथी मोहल्ला,
कोळीवाडा, वसई ४०१२०१
३) सौ.परवीन महमदहनीफ रवानी
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सदनिका नं.३०१, राधिका पॅराडाईस,
पो.बसेन, ता.वसई, जि.पालघर, ४०१२०१
४) सौ.शबाना आसिफ रवानी
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रुम नं.२०३, वैद्यानंद अपार्टमेंट,
मोहल्ला रोड, वसई ४०१२०१
५) श्रीमती.समिरा शकील मेमन (मयत तर्फे वारस)
५ अ) कु.अरबाज शकील मेमन
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
५ ब) कु.युसूफ शकील मेमन
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
५ क) कु.मोहम्मद साद शकील मेमन (अ.पा.क.)
वय : ८ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.लकी हाऊस, गौसिया मस्जिद,
कोळीवाडा, वसई, (प) ४१०२०१
६) सौ.रोशन शब्बीर भागवानी
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
काद्री मंझील कोळीवाडा, वसई (प) ४०१२०१
७) सौ.शाहिन नदीम मर्चंट
वय : ४२ वर्ष, धंदा : गृहिणी
रुम नं.२३, बिल्डींग नं.०७, नाखुडा मोहल्ला,
मांडवी, मुंबई ४००००३ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.शब्बीर अब्दुल कादर भागवणी यांचा मृत्यू दि.१३/०५/२०२२ रोजी नानावटी हॉस्पिटल, मुंबई त्याअर्थी अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

मृत्यूसमयी कै.शब्बीर अब्दुल कादर भागवाणी यांच्या नावे मौजे : खरवई व शेणगांव, ता.खालापूर, जि.रायगड हद्दीत खालील वर्णनाच्या **जमीन मिळकती आहेत.**

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खरसई व शेणगांव, ता.खालापूर, जि.रायगड**

| गाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १<br>खरवई | गट क्रमांक व उपविभाग :<br>१६/१/ब<br>ता.खालापूर, जि.रायगड | हे.आर.चौ.मी.<br>००.८४.००<br>आकार ६.४६<br>सामाईक क्षेत्र |
| २<br>शेणगाव | गट क्रमांक व उपविभाग :<br>१७७/२<br>ता.खालापूर, जि.रायगड | हे.आर.चौ.मी.<br>००.४८.००<br>आकार ३.२३ |
| ३<br>शेणगाव | गट क्रमांक व उपविभाग :<br>१७७/४<br>ता.खालापूर, जि.रायगड | हे.आर.चौ.मी.<br>००.५९.५०<br>आकार ५.६२ |

वरील अर्जदार हे कै.शब्बीर अब्दुल कादर भागवाणी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत द्यावयाची असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, सदर नोटीशीचा कालावधी संपण्याअगोदर योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांस त्यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करील आणि ते जर कै.शब्बीर अब्दुल कादर भागवाणी यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारस दाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.५ माहे नोव्हें सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## राहत्या घरातून दोन मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने दोन मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना शहरातील भुसार मोहल्ला येथे घडली आहे.

इम्तियाज अब्दुल लतीफ पावले (वय ३५ ) रा. भुसार मोहल्ला, पनवेल हे त्यांच्या राहत्या घरात झोपले असतांना घराचा मुख्य दरवाजा कडी न लावलेल्या व फक्त ढकलून बंद केलेल्या अवस्थेत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा ढकलून आत प्रवेश करून घराच्या हॉल मध्ये ठेवलेले हजारो रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन चोरून नेल्याने याबाबत ची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दिवाळी किल्ले स्पर्धेचा बक्षीस समारंभ

**दै.रायगड नगरी । चौक**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारीतील सरनोबत नेताजी पालकर यांच्या जन्म गावी कार्यरत नेताजी पालकर मंडळ व परिसर तर्फे गेली सदतीस वर्षे विद्यार्थ्यांसाठी किल्ले स्पर्धा आयोजित केले जात आहे, या वर्षाची स्पर्धा चौक शहर, चौक नवीन वसाहत, हातनोली पाली, धारणी, जांभिवली, या गाव पातळीवर घेण्यात आली स्पर्धेचे परीक्षण निसर्ग मित्र संस्था,पनवेल या कार्यकर्त्यांनी केले सदर स्पर्धे चा बक्षीस समारंभ रविवार दिनांक ६ नोव्हेंबर २२ रोजी दुपारी २ वाजता नेताजी पालकर जन्मस्थळ नजीकच्या श्री हनुमान मंदिरात हनुमान प्रसादिक भजनी मंडळ चौक चे अध्यक्ष हरिभक्त परायण हरी महाराज माळी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला असून शिव व्याख्याते के. एस.जाधव यांचे राष्ट्रीय संभाजी महाराज जीवन कार्य या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.बक्षीस समारंभ मान्यवरांच्या उपस्थित आयोजित केला असल्याचे मंडळाचे संघटक रायगड भूषण यशवंत सकपाळ व स्पर्धा प्रमुख भूषण पिंगळे यांनी पत्रकारद्वारे जाहीर केले आहे


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कर्नाळा किल्ल्यावर तीन महिन्यांपासून बंदी कायम ; धोकादायक बांधकाम दुरुस्त करण्याकडे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इतिहासाचा साक्षीदार असलेल्या कर्नाळा किल्ल्यावर काही प्रमाणात बांधकाम धोकादायक झाल्याने तीन महिन्यांपूर्वी या ठिकाणी बंदी घालण्यात आली आहे. मात्र वनविभागाकडून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले नाही. परिणामी किल्लयावर जाण्यास अद्यापही मनाई आहे. या कारणाने गिर्यारोहक, पर्यटक आणि इतिहास प्रेमींमध्ये निराशाचे वातावरण आहे. याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.




पनवेलपासून १२ कि.मी अंतरावर कर्नाळा अभयारण्य परिसरात उंचावर १२४८ साली कर्नाळा किल्ला बांधण्यात आला. देवगिरीच्या यादवाचा सुरूवातीला त्याच्यावर अमल होता. त्यानंतर मुघलांनी हा किल्ला सर केल्याचे इतिहास काही प्रमाणात दाखले देतोय. १५८२ दरम्यान या ठिकाणी निजामशाही होती. मात्र वसईच्या कॅप्टनने ३०० युरोपियन सैन्याचा वेढा टाकून ही प्राचीन वास्तु काबीज केली. पोर्तुगिजाने १७५० पौंडाचा बदल्यात तो पुन्हा निजमाला बहाल केला. या किल्लयांचे अनान्य साधारण असे महत्व लक्षात घेता मुघलांनी काही काळ राज्य केले . १६७० छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाळा किल्ला जिंकून त्याचा स्वराज्यात समावेश करून घेतला. पुरंदरच्या तहात मिर्झा राजा जयसिंगाने इतर गडांबरोबर कर्नाळयाचाही बळी घेतला. मात्र नंतर पुन्हा हा तिहासिक ठेवा हिंदवी स्वराज्यात समील झाला. पुढे औरंगजेबाने या किल्लयाला पुन्हा पारतंत्र्याच्या साखळदंडात जेरबंद केले. १७४० साली पेशवांनी पुन्हा कर्नाळा सर केला. १८०३मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशवाने राज्याबरोबर हा किल्ला सुध्दा गमवला. इंग्रजांनी कर्नाळयावर स्वःता अंमल केला, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा या किल्लयाचे किल्लेदार होते. एकंदरीत तिहासिक दृष्टया अतिशय जुना आणि महत्वाचा असलेला हा अनमोल ठेवा भौगलिकदृष्टया त्या काळात उपायुक्त होता. याचे महत्वाचे कारण म्हणजे कर्नाळयावरून मुरूंड जंजिरा, अलिबाग, रायगड, घाटमाथा, मुंबई या सर्व गोष्टी पहाता येत होत्या. आणि आजही त्या वर गेल्यावर दिसतात. पनवेलला मोठी बाजारपेठ व मिठागरे, बंदर असल्याने टेहळणी करीता कर्नाळा किल्ला अतिशय महत्वाचा समजला जात होता. याच परिसरात घनदाट झाडे आणि पक्षांच्या सानिध्यात त्याचबरोबर कर्नाळा हा इतिहासाची साक्ष्य देणारा उंचावर किल्ला असल्याने अनेक पर्यंटक व गिर्यारोहक व इतिहास प्रेमी या ठिकाणी येतात. मुंबई, ठाणे आणि इतर ठिकाणाहून अनेकजण सुट्टी किंवा वेळ मिळेल तेव्हा कर्नाळ्यात येतात. दरम्यान कर्नाळा किल्लयावरील एका ठिकाणी बांधकाम नादुरुस्त अवस्थेत आहे.नुकताच उपवनसंरक्षक यांनी सहाय्यक वनसंरक्षकांबरोबर कर्नाळा अभयारण्य परिसराचा दौरा केला. तेव्हा पर्यटकांच्या दृष्टिकोनातून किल्लयावरील बांधकाम धोकादायक असल्याने येथे बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान हे बांधकाम त्वरित दुरुस्त करण्याचे आदेश सुद्धा देण्यात आले होते. मात्र याबाबत कोणतीही उपाययोजना किंवा हालचाल न झाल्याने कर्नाळा किल्लयावर जाण्यास मनाई करण्यात आली आहे. इतिहासाचा साक्षीदार सध्या एकांत वासात असल्याचे दिसून येत आहे.

कर्नाळा अभयारण्य परिसरात प्रवेश शुल्क घेण्यात येते. परंतु किल्लयावर जाण्यास मनाई असल्याने अर्धा तासातच पर्यटकांना परतावे लागते. परिणामी त्यांच्यामध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटतो. या सर्व पार्श्वभूमीवर वनविभागाने त्वरित उपाययोजना करून कर्नाळा किल्लयावर प्रवेश द्यावा अशी मागणी ग्राम परिस्थितीकी विकास समिती कल्हे यांच्याकडून करण्यात आली आहे.

# जमशेदजी टाटा यांचे जीवनपट प्रदर्शनाद्वारे सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**

भारताला प्रगत जगतामध्ये मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी भारतीय व्यावसायिक म्हणून श्री जमशेदजी टाटा यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये म्हणजेच १८६८ या सालापासून सुरू केलेल्या व्यवसायाने पुढे मोठे भव्य रूप धारण केले होते त्यांनी त्यावेळी घेतलेले निर्णय यामुळे आज भारताची मान मोठ्या गर्वाने डौलत आहे त्यांच्या जीवना वरील त्यांनी केलेल्या कार्याची माहिती सर्व सामान्य भारतीयांना असावी म्हणून टाटा फाउंडेशन तर्फे देशातील विविध भागांमध्ये प्रदर्शने भरवून त्यांच्या कार्याची माहिती दिली जात आहे, या संस्थेच्या अकराव्या प्रदर्शनाचे उद्घाटन आज माथेरानचे अधीक्षक श्री दीक्षांत देशपांडे व मुख्याधिकारी सौ सुरेखा भणगे शिंदे यांच्या हस्ते माथेरानमध्ये करण्यात आले.



टाटा सेंट्रल अचीवर्स व माथेरान नगरपालिका यांच्या संयुक्त आयोजनांमधून येथील कम्युनिटी हॉलमध्ये जमशेदजी टाटा यांचे जीवन चरित्र दाखविण्यात येत असून माथेरानचा पर्यटन हंगाम पाहता हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत ठेवण्यात आले असून शालेय विद्यार्थ्यांना या जीवन चरित्र पटा मुळे प्रोत्साहन मिळावे हा याचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी आवर्जून सांगितले यापूर्वी असे प्रदर्शन मुंबई पुणे चेन्नई बेंगलोर दिल्ली सारख्या मोठ्या सिटी मध्ये करण्यात आले होते परंतु माथेरान सारख्या ठिकाणी टाटा समूहाचे व्यावसायिक रेस्ट हाऊस आहेत व ज्यांला टाटा समूहाच्या परिवारातील अनेकांनी ही भेटी दिलेला असल्याने येथे हे प्रदर्शन येथे भरविण्यात आले आहे त्यात प्रामुख्याने १८५६ मध्ये जमशेदजी टाटा यांनी सुचविलेल्या विविध योजना ज्या आता लागू करण्यात आले आहेत ही त्यांची दूरदृष्टी दाखवण्याचे काम करते हे विद्यार्थ्यांना कळावे व त्यापासून बोध घ्यावा हा उद्देश आहे, अतिशय खडतर काळामध्ये लोहपुरुष पदवी मिळविण्याकरता लोखंडाचा कारखाना उभा करण्याकरता त्यांनी घेतलेल्या अपार कष्टाची माहिती या प्रदर्शनामध्ये दिसून येते मुंबईमध्ये भारतीयांना प्रवेश असावा याकरिता ताजमहल या हॉटेलची स्थापना केली त्याचीही रंजक कहानी या प्रदर्शनांमध्ये पहावयास मिळते.त्यांच्या जीवनावरील चरित्र पट ही ह्या ठिकाणी दाखविला जात आहे.

हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून आजपासून दहा तारखेपर्यंत सर्वांसाठी मोफत असणार आहे या प्रदर्शनाचे उद्घाटन माथेरानचे अधीक्षक श्री दीक्षांत देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख पाहुण्या म्हणून माथेरानच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सौ सुरेखा भणगे शिंदे या होत्या तर या वेळी टाटा समूहाचे झुबिन मेस्त्री वाईस प्रेसिडेंट फायनान्स, श्री राजेंद्र नारला, अभिजीत शेट्टे असिस्टंट मॅनेजर, माथेरान रेस्ट हाऊसचे व्यवस्थापक श्री प्रवीण सकपाळ त्याचप्रमाणे माथेरानच्या माजी नगराध्यक्ष सौ प्रेरणा सावंत माजी नगराध्यक्ष श्री अजय सावंत मनोज खेडकर विवेक चौधरी व माथेरान मधील असंख्य प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## पनवेलमध्ये मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे .

पांडुरंग पाटील ( वय ३० ) रा. करंजाडे यांनी त्यांची हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एम एच ०९ – ए के ५१६१ ही पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील रस्त्यावर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मानाच्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

### विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा अटल करंडक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला आजपासून (दि.०५) पुणे येथील केंद्रातून प्राथमिक फेरीच्या उदघाटनाने प्रारंभ झाला. रामकृष्ण मोरे सभागृहात झालेल्या या प्राथमिक फेरीचे भाजपचे सांस्कृतिक सेलचे प्रदेशाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक सेलचे प्रदेश सहसंयोजक उमेश धनसाली, दिग्दर्शक, अभिनेते व लेखक दीपक पवार, लेखक व अभिनेते राहुल वैद्य, तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, खजिनदार अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, चिन्मय समेळ यांच्यासह कलावंत उपस्थित होते.

नाटय चळवळ वर्द्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वर्द्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात.

स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला आजपासून विभागनिहाय प्रारंभ झाला आहे. त्यानुसार पुणे केंद्रावर ४ व ५ नोव्हेंबर, सातारा केंद्र ०६ नोव्हेंबर, रत्नागिरी ०८ नोव्हेंबर, जळगाव केंद्र १२ नोव्हेंबर, नाशिक १३ नोव्हेंबर, रायगड (पनवेल) १९ व २० नोव्हेंबर, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली केंद्रांची प्राथमिक फेरी २४ ते २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर अंतिम फेरी ०२ ते ०४ डिसेंबर २०२२ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या स्पर्धे चे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे. अंतिम फेरीतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये, आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांकास ५० हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, ततीय क्रमांक २५ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक १० हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ एकूण दोन बक्षिसे प्रत्येकी ०५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप असून सर्वोत्कष्ठ अभिनेता( वैयक्तिक), सर्वोत्कष्ठ अभिनेत्री (वैयक्तिक ), सर्वोत्कष्ठ दिग्दर्शक (वैयक्तिक), सर्वोत्कष्ठ लेखक (वैयक्तिक), सर्वोत्कष्ठ संगीत (वैयक्तिक), सर्वोत्कष्ठ नेपथ्य (वैयक्तिक), सर्वोत्कष्ठ प्रकाश योजना (वैयक्तिक), तसेच रायगड जिल्हा प्राथमिक फेरीतील प्रथम क्रमांक १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक ०६ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ०४ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह त्याचबरोबर अंतिम फेरीकरिता सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका, लोककलेवर आधारित एकांकिका, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार व बाल कलाकार यांनाही विशेष पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

# पेण तालुक्यात शेकडो तरुणांचा मनसेत जाहीर पक्ष प्रवेश

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन,विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित ठाकरे यांचा कामाचा झंझावत पाहून, रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील यांच्या नेतृत्वात पेण तालुक्यात शेकडो तरुणांनी मनसेत जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.



गेल्या काही महिन्यांपासून पेण तालुक्यात मनसे मोठ्या प्रमाणावर उभारी घेताना दिसत आहे. मनसेचे पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील हे आपल्या पदाधिकाऱ्यांसोबत पक्ष वाढीसाठी तालुक्यातील गावागावात जाऊन राजसाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळात पोहचवत आहेत.

तसेच रुपेश पाटील हे गोरगरीब जनतेची सेवा करणे, रात्री–बेरात्री जनतेसाठी धाऊन जाणे, कामगारांचे थकलेले पगार मिळवून देणे अशी अनेक कामे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून करत आहेत.याच मुळे अनेक नागरिक,तरुण मोठ्या प्रमाणात पेण तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत.

यातंच एक मनाला भावणारी गोष्ट घडली कि एक ६५ वर्षीय आजोबांनी सुद्धा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी त्या आजोबांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता.

राज साहेबांचे विचार तळागाळात तालुक्याच्या कानाकोपऱ्यात पोहवण्यास आपण खूप मेहनत करू लोकांच्या समस्या सोडवू .या पुढेही पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पक्ष प्रवेश होणार आहेत. तसेच प्रत्येक गाव तिथे शाखा, चौक तिथे झेंडा हा कार्यक्रम पूर्ण पेण तालुक्यात राबविण्यात येणार आहे.तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी जोरदार प्रयत्न केले जातील. भविष्यात रायगड जिल्ह्यातील पेण तालुका हा मनसेचा बालेकिल्ला मानला जाईल. असे पेण तालुका मनसेचे अध्यक्ष रुपेश पाटील यांनी सांगितले

यावेळी शारीरीक सेनेचे जिल्हाध्यक्ष निकेश पाटील , हिरामण जेधे, तालुका उपाध्यक्ष हनुमान नाईक,श्रीराम म्हात्रे ,रोहन पाटील ,सचिन भोईर,ओमकार कचरे , तेजस पाटील साहिल म्हात्रे आदिसह मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# रोज बाजाराकडून शुल्क; आठवडे बाजार मात्र निशुल्क ; पनवेल महानगरपालिकेचा अजब कारभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोज बाजारामध्ये नियमितपणे व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांकडून पनवेल महानगरपालिकेने शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे. परंतु दुसरीकडे बेकायदेशीररित्या भरवण्यात येणाऱ्या आठवडे बाजार निशुल्क पद्धतीने भरत आहे. याबाबत पथविक्रेता तथा शहर फेरीवाला समितीच्या बैठकीमध्ये लक्ष वेधण्यात आले. समितीचे सदस्य सचिन गायकवाड यांनी हा मुद्दा उपस्थित करीत संबंधितांकडूनही शुल्क वसूल करावे अशी मागणी केली.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विशेष करून सिडको वसाहतींमध्ये आरक्षित जागेवर रोज बाजार सुरू आहेत. कळंबोली मध्ये अशा प्रकारचे दोन रोज बाजार आहेत. या व्यतिरिक्त इतर वसाहतींमध्ये सुद्धा आरक्षित भूखंड महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहेत . येथेही रोज बाजार भरवण्यात येणार आहेत . कळंबोलीत राखीव भूखंडावर फेरीवाले आता व्यवसाय करू लागले आहेत. दरम्यान पनवेल महानगरपालिकेच्या महासभेमध्ये रोज बाजारात व्यवसाय करणाऱ्यांना शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याची अंमलबजावणी सध्या कळंबोली सुरू झाली आहे. या शुल्कला काही प्रमाणात विरोध केला असला तरी याबाबत महापालिका प्रशासन ठाम आहे. रोज बाजारातील विक्रेत्यांकडून शुल्क घेणे हे नियमात बसण्यासारखे असले तरी आठवडे बाजार मात्र मोकाट आहेत. सिडको वसाहतीमध्ये दररोज एका ठिकाणी वसुली दादा आठवडे बाजार भरवत आहेत. मोकळ्या भूखंडांवर काही ठिकाणी रस्त्यांवर हा बाजार भरवला जातो. मुंबई मधून वेगवेगळ्या वस्तूंची विक्री करणारे विक्रेते या बाजारात येतात. वसुली दादा त्यांच्याकडून पैसे घेऊन महिन्याला लाख रुपयांची कमाई करतात. यामध्ये काही शासकीय यंत्रणांचे सुद्धा हात माखले आहेत. त्यामुळे संबंधितांवर कोणतीही कारवाई केली जात नाही. दरम्यान पनवेल महानगरपालिका पदपथावर व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करत आहे. तसेच रोज बाजारात विक्री करणाऱ्यांकडून शुल्क वसूल करत आहे. मात्र बेकायदेशीर रित्या आठवडे बाजारांना कोणतेही शुल्क महानगरपालिका प्रशासनाकडून लावण्यात येत नाही. त्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यांनी केलेला कचरा महापालिकेचा आरोग्य विभाग उचलत आहे. तेथील रस्ते सुद्धा मनपा साफ करत आहे. मात्र संबंधित आठवडे बाजाराकडून प्रशास–नाला कोणतेच उत्पन्न मिळत नाही. या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या फेरीवाला समितीच्या बैठकीमध्ये समितीचे सदस्य सचिन गायकवाड यांनी शुल्काबाबत मुद्दा उपस्थित केला. आठवडे बाजारात विक्रीसाठी आलेल्या कडून महापालिकेने नियमानुसार शुल्क आकारावे अशी मागणी त्यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली. जर महानगरपालिकेने शुल्क आकारले तर संबंधित विक्रेते दुसऱ्यांना पैसे देणार नाहीत. आणि यामधून होणारे बेकायदेशीर वसुली थांबेल असे मत शहर फेरीवाला समितीच्या बैठकीत गायकवाड यांनी व्यक्त केले.

पनवेल महानगरपालिकेने सिडको वसाहतींमध्ये ना फेरीवाला क्षेत्र जाहीर केले नाही. तशा आशयाचे फलक सुद्धा लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे साहजिकच फेरीवाले कुठेही व्यवसाय करीत आहेत. त्यांच्यावर निर्बंध आणि बंधन नसल्याने रस्ते आणि पदपथ काबीज करण्यात आले आहेत. तसेच आठवडे बाजार सुद्धा त्या ठिकाणी भरत आहे. विशेष करून कामोठे वसाहतीत ना फेरीवाला क्षेत्र जाहीर करावे अशी मागणी सचिन गायकवाड यांनी केलेली आहे.